प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

शिवाजीनगर, पुणे ५

दिनांक: **11** मार्च, **2024**

**CIRCULAR NO. EXAM-2024-25**

<u>शासन निर्णयानुसार दुष्काळग्रस्त महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा**-** शुल्क माफी/परतावा देणेबाबत</u>

संदर्भ**:**

1. महाराष्ट्र शासन निर्णय, महसूल व वन विभाग, शा. नि. क्र. एससीवाय-2023, प्रकरण क्रमांक 37/ म-7 दिनांक 10 नोव्हेंबर, 2023.
2. महाराष्ट्र शासन निर्णय, महसूल व वन विभाग, शा. नि. क्र. एससीवाय-2023, प्रकरण क्रमांक 37/ म-7 दिनांक 16 फेब्रुवारी, 2024.

वरिष्ठ महाविद्यालयाच्या मार्च 2024 या परीक्षा हंगामाच्या सत्रांत परीक्षा या दिनांक 19 मार्च 2024 पासून सुरू होत आहेत. वरील संदर्भीय शासन निर्णयानुसार, जे विद्यार्थी दुष्काळग्रस्त भागातील रहिवासी आहेत, त्यांचे परीक्षा शुल्क (Examination Fees) माफ करण्यात येत आहेत. ज्या दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरून परीक्षा शुल्क जमा केलेले आहे, त्यांना परीक्षा शुल्काचा परतावा दिला जाईल. सदर शासन निर्णय सोबत जोडलेले आहेत.

तरी मार्च 2024 च्या परीक्षा अर्ज भरताना, ज्या विद्यार्थ्यांना या परीक्षा शुल्क माफीचा लाभ घ्यायचा आहे, त्यांनी नोटीस सोबत जोडलेल्या परीक्षा शुल्क-माफी/परतावा मिळणे बाबतचा अर्ज दिनांक 15/3/2024 पर्यंत भरून, परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करून घ्यायची आहे.

सदर परीक्षा शुल्क माफीसाठी खालील विद्यार्थी पात्र ठरतील.

- संदर्भ क्रमांक **1** व **2** नुसार, दुष्काळग्रस्त तालुका/गावातील रहिवासी विद्यार्थी
- शैक्षणिक वर्ष **2023-2024** साठी कुठलीही शासकीय फी सवलत किंवा शिष्यवृत्ती यांच्यासाठी अर्ज न केलेले विद्यार्थी
- आर्थिक वर्ष **2022-23** या वर्षासाठी पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये आठ लाख पेक्षा कमी असलेले विद्यार्थी

परीक्षा शुल्क-माफी/परतावा अर्ज भरण्यासाठी खालील कागदपत्रे अर्जासोबत जोडण्याची आवश्यकता आहे.

- दुष्काळग्रस्त भागातील रहिवासी असलेला रहिवासी दाखल्याची साक्षांकित प्रत
- पालकांच्या उत्पन्ना संदर्भात सक्षम अधिकाऱ्यांनी पारित केलेल्या उत्पन्न दाखल्याची साक्षांकित प्रत
- वरील कागदपत्रांसाठी नुकताच अर्ज केला असल्यास, अर्ज दाखल केल्याची पोचपावती

परीक्षा शुल्क**-**माफी/परतावा अर्ज भरण्यासाठी प्रक्रिया खालील प्रमाणे असेल**.**

- ✔ विद्यार्थ्याने आपला रेग्युलर व बॅक-लॉक परीक्षेचा परीक्षा अर्ज नेहमीप्रमाणे ऑनलाइन पद्धतीने भरून त्याची एक प्रत प्रिंट घ्यावी
- ✔ या नोटीस बरोबर जोडलेल्या परीक्षा शुल्क-माफी/परतावा अर्ज व प्रतिज्ञापत्र यांची प्रिंट घेऊन ते पूर्ण भरून घ्यावेत.
- ✔ दोन्ही अर्ज भरून झाल्यानंतर, अकाउंट सेक्शन येथे श्री**.** संभाजी शेंडकर **(Main Campus)** किंवा श्री**.** देवेंद्र साठे **(B.A.Campus)** यांच्याकडे परीक्षा शुल्क माफी परतावा अर्ज व परीक्षा अर्ज तपासून घ्यावा.
- ✔ अर्ज तपासल्यानंतर संबंधित कर्मचारी आपणास परीक्षा शुल्क कमी करून इतर परीक्षा शुल्काची रक्कम सांगतील व तसा शेरा शुल्क माफी/परतावा अर्ज, प्रतिज्ञापत्र व परीक्षा फॉर्म यावर देतील.
- ✔ ठरवून दिलेली इतर फी विद्यार्थ्याने ऑफिसमध्ये कॅश काऊंटर येथे भरावयाची आहे व दोन्ही फॉर्म कॅश काउंटर येथे जमा करायचे आहे.
- ✔ इतर परीक्षा फी भरून झाल्यानंतर, सदरची फी भरल्याची पावती विद्यार्थ्याने हॉल तिकीट प्रक्रियेसाठी स्वतःजवळ जपून ठेवायची आहे.
- ✔ परताव्यासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांचे बँक डिटेल्स हे व्यवस्थित भरून द्यायचे आहेत**.**
- ✔ परताव्यासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी परीक्षेचा अर्ज व परतावा अर्ज हा अकाउंट सेक्शन येथेच संबंधितांकडे जमा करायचा आहे**.**
- ✔ फक्त परीक्षा शुल्क-माफी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना बँक डिटेल्स देण्याची आवश्यकता नाही.

परीक्षा अर्ज करणाऱ्या दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना कुठलीही विलंब फी आकारली जाणार नाही. दिनांक 15 मार्च 2024 नंतर परीक्षा शुल्क माफी/परताव्यासाठी अर्ज स्वीकारला जाणार नाही, याची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.






डॉ. आर. एम. जगताप — परीक्षा नियंत्रक

डॉ.अंजली सरदेसाई — उपप्राचार्य, शैक्षणिक

प्रा. शामकांत देशमुख — उपप्राचार्य, प्रशासन

डॉ.आर. एस. झुंजारराव — प्राचार्य

दिनांक: ….. मार्च, **2024**

<u>परीक्षा शुल्क-माफी/परतावा अर्ज</u>

अर्जाचा प्रकार:…………………………..( शुल्क-माफी/परतावा)

<u>प्रति,</u>
<u>मा. प्राचार्य,</u>
मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), शिवाजीनगर, पुणे 5.

मी अर्जदार ………………………………………………………………, महाराष्ट्र शासन निर्णय, महसूल व वन विभाग, शा. नि. क्र. एससीवाय-2023, प्रकरण क्रमांक 37/ म-7 दिनांक 10 नोव्हेंबर, 2023 आणि महाराष्ट्र शासन निर्णय, महसूल व वन विभाग, शा. नि. क्र. एससीवाय-2023, प्रकरण क्रमांक 37/ म-7 दिनांक 16 फेब्रुवारी, 2024 अन्वये दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांसाठीच्या परीक्षा शुल्क-माफी/परतावा योजनेस पात्र असून, मला या योजनेचा लाभ देण्यात यावा, ही नम्र विनंती.

| | | |
|---|---|---|
| **1** | विद्यार्थ्याचे नाव | |
| **2** | **Enrollment No/Member ID** | |
| **3** | **2023-2024** इयत्ता | |
| **4** | तुकडी | |
| **5** | मोबाईल नंबर | |
| **6** | ईमेल आयडी | |
| **7** | विद्यार्थ्यांचा पूर्ण पत्ता | |
| **8** | पालकांचे नाव | |
| **9** | पालकांचा मोबाईल नंबर | |
| **10** | पालकांचे **2022 23** या आर्थिक वर्षाचे वार्षिक उत्पन्न | |
| **11** | परीक्षा शुल्क माफीची/ परताव्याची रक्कम | |

दिनांक:

ठिकाण:

विद्यार्थ्याचे नाव व सही:

टीप : सदर अर्जाबरोबर रहिवासी दाखला , उत्पन्नाचा दाखला व प्रतिज्ञापत्र जोडावे….

## प्रतिज्ञापत्र

मी अर्जदार, ………………………………………… शैक्षणिक वर्ष 2023 24 मध्ये …………….. या वर्गात शिकत असून शासन निर्णय व नुसार दुष्काळग्रस्त प्रवर्गात मोडत असून ,मी परीक्षा शुल्क-माफीसाठी/ परताव्यासाठी पात्र आहे.

मी आपणास खात्री देते / देतो की,

1. उपरोक्त शासन नियमाप्रमाणे मी दुष्काळग्रस्त तालुक्याचा रहिवासी आहे व संबंधित रहिवासी दाखला मी अर्जासोबत जोडला आहे माझ्या पालकांचे ऑब्लिक माझे वार्षिक उत्पन्न 2022-2023 वर्षाचे वार्षिक उत्पन्न हे रुपये 8,00,000/- (आठ लाखांपेक्षा) जास्त नाही व त्या संबंधित संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी पारित केलेला उत्पन्नाचा दाखला अर्जासोबत जोडत आहे.
2. मी शैक्षणिक वर्ष 2023 24 साठी कुठल्याही शासकीय फी सवलत किंवा शिष्यवृत्तीसाठी अर्ज केलेला नाही.
3. सदर परीक्षा शुल्क माफी किंवा परतावा अर्ज भरून शिल्लक इतर परीक्षा शुल्क मार्च 2024 च्या परीक्षा सुरू होण्यापूर्वी भरणे क्रमप्राप्त आहे. त्यानंतर विलंब झाल्यास माझा परीक्षा शुल्क-माफी/परतावा अर्ज गृहीत धरला जाणार नाही, याची मला माहिती आहे.
4. परीक्षा शुल्क परताव्यासाठी माझ्या बँक खात्याचे तपशील खालील प्रमाणे आहेत.
   बँक खाते क्रमांक:…………………………………
   बँकेचे नाव :…………………………………
   शाखा :…………………………………
   आय एफ एस सी कोड :……………………….
   सोबत बँकेच्या बँक खात्याच्या पुस्तकाच्या पहिल्या पानाची प्रत जोडलेली आहे.

दिनांक :
ठिकाण : विद्यार्थ्याचे नाव व सही

……………………………………………………………………………………………………………………………………………..........……

महाविद्यालयीन कार्यवाहीसाठी

दुष्काळग्रस्त अर्जदार विद्यार्थी, ……………………………………………………………………..यांचा परीक्षा शुल्क- माफी/परतावा अर्ज दिनांक ………………..रोजी प्राप्त झाला.

सोबत जोडलेल्या कागदपत्रानुसार, सदर विद्यार्थी हा दुष्काळग्रस्त भागातील परीक्षा शुल्क-माफी/परतावा यासाठी पात्र आहे/नाही.

(अर्ज अपात्र असल्यास अपात्रतेचे कारण:…………………………………………………………………………….)

सदर पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांची रुपये …………… परीक्षा शुल्क – माफ/परतावा करण्यासाठी शिफारस आहे.

दिनांक :

कनिष्ठ लिपिक प्रबंधक प्राचार्य